डोअर
स्टेप
स्कूल





डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–७)

## दोन मित्र आणि एक पत्र



प्रकाशकः

डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७

☎ २५८९८७६२
२५४३२१६५

ई-मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७

☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

किंमत रू.

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# दोन मित्र आणि एक पत्र

कल्पना परकीय

टुण टुण बेडूक दारात कशाची तरी वाट बघत बसला होता. तिकडून आला डरावडराव बेडूक. तो रोजच यायचा. टुणटुणकडे बघून त्याने टुणटुणला विचारले, “का रे बाबा असा उदास दिसतोस ?” “काय सांगु तुला? ही वेळ झाली ना की मला रोजच असे उदास वाटते.” टुणटुणने सांगितले. “असं का बरे ?” डरावडरावने टुणटुणला विचारले.



“ही पत्राची वेळ आहे ना. मला कोणाचे तरी पत्र येईल अशी मी रोज वाट पहातो. पण पत्र काही येत नाही. खर तर मला कोणीच अजून कधी पत्र पाठवलेले नाही. पण ही वेळ झाली ना की दारात येऊन बसल्याशिवाय मला काही राहवत नाही. अगदी चैनच पडत नाही. वाट बघून बघून पत्र आले नाही की मला अगदी रडूच येते.” टुणटुण म्हणाला आणि परत आपला दाराकडे बघून पत्राची वाट बघत बसला. शेजारी डरावडरावही बसला. दोघेही आपले वाट बघताहेत पण पत्र काही आले नाही. हळूहळू टुणटुणचा चेहरा रडवेला झाला. डरावडरावला एकदम काहीतरी आठवले. “जरा घरी जाऊन येतो,” असे म्हणून तो लगबगीने उठला आणि टुणटुणने काही विचारायच्या आधीच बाहेर देखील पडला.

डरावडराव घरी आला. त्याने एक कागद घेतला, एक पेन घेतले आणि लागला लिहायला–



“मित्रा टुणटुण, तू मला फार आवडतोस. तू बरोबर असलास ना की मला अगदी छान वाटते. तुला कोणी पत्र पाठवले नाही म्हणून तुला वाईट वाटते ना ? पण आता रडू नकोस. बघ लिहले की नाही मी तुला पत्र ? आता हास पाहू.

तुझा मित्र,
डरावडराव.”



डरावडरावने पत्र पुरे केले. पत्राची छान घडी केली आणि मग ते पत्र एका पाकीटात घातले: पाकीट बंद केले आणि मग निघाला हळूबाई गोगलगायीकडे. डरावडराव तिला म्हणाला "हळूबाई हळूबाई, माझे काम करतेस का ?" हळूबाईने सावकाश तोंड बाहेर काढले आणि विचारले,"कसले काम ?" "हे पत्र घे आणि जरा टुणटुणला नेऊन दे. त्याला कधीच कोणी पत्र पाठवले नाही म्हणून फार वाईट वाटते. मग देशील का हे पत्र त्याला ?" डरावडराव म्हणाला. "हो देईन की. तू मुळीच काळजी करू नकोस. मी ही अशीच निघते आणि पत्र देऊन येते." हळूबाई म्हणाली आणि तिने पत्र घेतले व तडक निघाली.

डरावडराव परत आला टुणटुणकडे. टुणटुण आपला हिरमुसला होऊन घरात बसला होता. डरावडराव म्हणाला "टुणटुण ये की आपण पत्राची वाट बघू या." "नको



आता पत्राची वेळ निघून गेली." टुणटुण म्हणाला. "असू दे. तरी पण ये. मला वाटतंय की आज तुला पत्र येइलच येईल." डरावडराव म्हणाला. "काहीतरीच बोलू नकोस. जे कधीच झाले नाही ते आज कसं होईल?" टुणटुणने विचारले. "होईल. मी सांगतोय ना," म्हणत डरावडरावने टुणटुणला जवळजवळ ओढतच बाहेर आणले. परत आपले दोघेजण दारात पत्राची वाट बघत बसले. टुणटुणला खरं तर मुळीच बसायचं नव्हतं. पण काय करणार? डरावडराव पुढे त्याचे काही चालेना.

असा बराच वेळ गेला. डरावडरावला काही कळेचना. अजून कशी येत नाही ही हळूबाई. अगदी लगेच जाते म्हणाली आणि मग काय झालं? एवढा वेळ कशाला लागतो?

इकडे टुणटुणने भूणभूण लावलीच होती, "चल घरात, चल घरात, म्हणून." त्याचे आपले एकच. "पत्र काही येणार नाही." शेवटी

डरावडराव वैतागला. “पत्र येणार म्हणजे येणार.” तो रागाने म्हणाला. “कशावरून ?” टुणटुणने विचारले. “कारण मीच तुला पत्र लिहलंय. झालं समाधान ? ती हळूबाई गोगलगाय अजून काय करतेय माहित नाही. घर सापडले नाही की काय? माझंच चुकलं. तिला सांगायलाच नको होतं” डरावडराव म्हणाला. पण टुणटुणचं तिकडे लक्षच नव्हतं. डरावडरावनं “मी तुला पत्र लिहलंय”, असं सांगितलं आणि टुणटुणचा कंटाळा एकदम पळाला. तो डरावडरावला म्हणाला, “इतका काही वेळ लागलेला नाही. येईल ती आता. पण तू मला काय लिहलं आहेस पत्रात?” “ते नाही मी सांगणार. ते तूच वाच.” डरावडराव म्हणाला. मग परत दोघे बसले मांडी ठोकून दारात.

इकडे हळूबाई गोगलगाय चालता चालता दमून गेली. आधीच ती हळूबाई, त्यात ते पत्र तसे जडच. ते घेऊन जाता जाता दम



लागणारच. पण ती कंटाळली नाही की थांबली नाही. अंधार पडत आला. घराघरात दिवे लागले तरी चालतच राहिली. आणि शेवटी एकदाची टुणटुणच्या घरी पोहोचली.

टुणटुण आणि डरावडराव दारातच होते. हळूबाईला येतांना पाहिले आणि दोघेही पळत सुटले. “या, हळूबाई या. बराच वेळ लागला यायला.”



"होय रे बाबा, दमले अगदी" म्हणत हळूबाईने टुणटुणला पत्र दिले. टुणटुणला पत्र पाहून इतका आनंद झाला, इतका आनंद झाला की तो पत्र घेऊन एकदम घरातच पळाला. टुणटुणचा आनंद पाहून डरावडराव तर खूष झालाच पण हळूबाईचा देखील सगळा शीण निघून गेला.

❑❑❑



# 'दम लगाके हैशा..'

(कल्पना परकीय)

एक होते आजोबा. घरासमोर बाग करायची त्यांना भारी हौस. अंगणात फुलझाडं लावायची, फळझाडं लावायची, परसात भाजी लावायची, हा त्यांचा छंदच.



एकदा त्यांनी लावले नवलकोल. गाजर, मुळा किंवा रताळी जशी जमिनीखाली वाढतात तसाच नवलकोलही जमिनीखालीच वाढतो. आजोबांनी नवलकोल लावले. ते आपले रोज परसात जायचे. खतपाणी करायचे आणि पाणी घालता घालता लहान मुलांना सांगावं तसं आपल्या झाडांना "खूप खूप मोठे व्हा" असं रोज रोज सांगायचे.





हळू हळू नवलकोल मोठे झाले. आतां नवलकोल काढले पाहिजेत म्हणून आजोबा परसात गेले आणि नवलकोल उपटू लागले. आजोबांनी एक हात लावला, दोन हात लावले, पाय जमिनीत रोवून अगदी ओठ आवळून जोर लावून बघितला. पण कसचे काय नि कसचे काय, नवलकोल काहीं हलेना.

शेवटी दमून आजोबा उभे राहिले. कपाळावरचा घाम पुसला आणि आजीला हाक मारली, "अग ए, जरा इकडे ये बघू. मदत कर थोडी."

आजी हात पुसत पुसत बाहेर आली, "काय



पाहिजे ?" तिने आजोबांना विचारले.

"हा नवलकोल निघत नाही. हलतच नाही

जागचा. ये जरा हात लावायला” आजोबा म्हणाले.

“थांबा, चुलीवर दूध आहे ते उतरवून येते” आजी म्हणाली. आजी बाहेर आली. आजोबांनी पुन्हा नवलकोल उपटायला सुरवात केली. आजीनं त्यांच्या कमरेला धरालं. आजोबा आणि आजी मिळून लागले नवलकोल ओढायला. पण कसचं काय आणि कसचं काय नवलकोल काहीं हलेना.

आजीआजोबा काय करताहेत म्हणून बघायला त्यांची नात आली दारात. बघते तर आजीआजोबा दोघं मिळून ओढताहेत नवलकोल. तिला खूप गंमत वाटली. ती म्हणाली, “थांबा, मी येतें मदतीला.” “तुझी कसली मदत..”, असं म्हणायच्या आत तिनं आजीच्या कमरेला पकडलंदेखील आणि म्हणाली, “हं, ओढा आतां, म्हणा, ‘दम लगाके हैशा’ ”. झालं, तिघही लागले नवलकोल ओढायला. पण कसचं काय नि कसचं काय , नवलकोल काहीं हलेना.

आजीआजोबा घामाघूम झाले. पण नातीला आपली गंमतच वाटतेय. तिकडून जात होता मोती कुत्रा. नातीनं मोतीला म्हटलं, “मोती कुठे चाललास.





चल ये मदत करायला.” मोती आला पळत पळत. त्यानं नातीचा परकर धरला तोंडात. नात म्हणाली, “मोती, जोरात ओढ, म्हण, ‘दम लगाके हैशा’ ”.

झालं आतां पुढे आजोबा, त्यांच्यामागे आजी, आजीच्या मागे नात आणि नातीच्या मागे मोती, आपले ओढताहेत, ओढताहेत, पण कसचं काय आणि कसचं काय, नवलकोल काहीं हलेना. तिकडून येत होती मनी. दबकत दबकत,हलक्या पावलांनी. पण नातीचं लक्ष गेलचं.तिने मनीला पाहिलंच.” मने, पळू नकोस. बघितलं आहे मी तुला. चल, ये मदतीला. लबाड कुठली!”



मालकीणीनं बोलावलं. मग मनी काय करणार ? दूध घालते ना रोज ती. शिवाय मांडीवर घेऊन कुरवाळतेही, तिचं ऐकलचं पाहिजे. मग मनीही आली. पुढे आजोबा, त्यांच्यामागे आजी, आजीच्या मागे नात आणि नातीच्या मागे मोती आणि मोतीच्या मागे मनी, आपले ओढताहेत, ओढताहेत, पण कसचं काय आणि कसचं काय, नवलकोल काहीं हलेना. बाहेर काहीं निघेना.

परसात होते एक बीळ.बिळात होते उंदीरमामा. मनीला येतांना पाहून उंदीरमामा पळाले होते बिळात. पण बराच वेळ झाला तरी मनी कशी येत नाही, काय करते आहे ती, कुठे लपून बसलीये, असं वाटून, अगदी जीव मुठीत धरून, हळूच, हलकेच,



बाहेर डोकावून बघतात तर काय, पुढे आजोबा, त्यांच्यामागे आजी, आजीच्या मागे नात आणि नातीच्या मागे मोती आणि मोतीच्या मागे मनी, करताहेत आपले 'दम लगाके हैशा, हैशा' बघून उंदीरमामांना हासूचं आलं. चला, आपणही लावूया हातभार म्हणत तेही आले बिळातून बाहेर आणि धरलं त्यांनी मनीच्या शेपटीला.

आतां पुढे आजोबा, त्यांच्यामागे आजी, आजीच्या मागे नात आणि नातीच्या मागे मोती मोतीच्या मागे मनी आणि मनीच्या मागे उंदीरमामा ओढताहेत, ओढताहेत, अगदी दातओठ खाऊन ओढताहेत. आणि एकदम काय झालं कुणाला काहीं कळलचं नाही, नवलकोल एकदम बाहेर आला.

मग काय एकच धांदल. आणि गंमतच गंमत!



आजोबा धपकन पडले आजीच्या अंगावर, आजी कोसळली नातीवर, नात पडली मोतीवर, मोती पडला मनीवर, पण मामा मात्र शहाणे मनी आपल्या अंगावर पडेल हे लक्षात येताच धूम ठोकून पळाले आपल्या बिळात आणि मनुताई बसल्या हात चोळीत.

लेखन: रजनी परांजपे



# आमची पुस्तके

अ–गट
- पुस्तकमाला भाग–१ (मुळाक्षरे)
- पुस्तकमाला भाग–२ (आकार)
- पुस्तकमाला भाग–३ (ईकार)
- पुस्तकमाला भाग–४ (उकार)
- पुस्तकमाला भाग–५ (एकार)
- पुस्तकमाला भाग–६ (ऐकार)
- पुस्तकमाला भाग–७ (ओकार)
- पुस्तकमाला भाग–८ (औकार)

ब–गट
- मुळाक्षरांचे पुस्तक
- कान्याचे पुस्तक
- वेलांटीचे पुस्तक
- उकारांचे पुस्तक
- एका मात्रेचे पुस्तक
- दोन मात्रांचे पुस्तक
- ओकाराचे पुस्तक
- औकाराचे पुस्तक

- जोडाक्षरांचा सराव - २ भाग
- कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
- लहान शब्दकोश
- गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
- हस्तपुस्तिका
- बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
- वयाचा दाखला कसा काढावा ?
- शालेय वाचनालय चालवताना